Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३] गुरुवार ते बुधवार, जानेवारी २०-२६, २०२२/पौष ३०-माघ ६, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	नाही.
संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१-५
भाग एक-अ.—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	१-१११

शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६१.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यांजकडून

पहावे:—(१) दिवाणी नियम पुस्तिका, भाग-१ मधील परिच्छेद क्रमांक ६९८, ६९९ व ७०२ आणि भाग-२ मधील परिशिष्ट 'ग'.

(२) जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर पत्र क्रमांक बी-८(१)-४०९५-२०२१, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ प्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना मंजुरीकरिता पाठविलेली वर्ष-२०२२ ची सुट्ट्यांची यादी.

(३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक X(Gen)-0202-2021-1803, दिनांक १४ डिसेंबर, २०२१ अन्वये सुटट्यांचे यादीला सूचवून दिलेली मान्यता.

अधिसूचना

क्रमांक बी-८(१)-२७०७-२०२१.—

मी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर, माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. (३) आणि दिवाणी नियम पुस्तिका, १९८६, भाग-१ मधील परिच्छेद ६९८, ६९९ व ७०२ व भाग-२ परिशिष्ट 'ग' अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून जिल्हा व सत्र

न्यायालय, नागपूर व त्याच्याशी संबंधित नागपूर जिल्ह्यातील सर्व दुय्यम दिवाणी व फौजदारी न्यायालयांकरिता कॅलेंडर वर्ष-२०२२ (शके १९४३-४४) करीता खालीलप्रमाणे सुट्ट्या जाहिर करीत आहे.—

वर्ष-२०२२ (शके १९४३-४४) सुट्ट्यांची यादी

भाग—१

अ.क्र.	सुट्टीचे नाव	दिनांक	वार	दिवस	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१.	गणराज्य दिन	२६-०१-२०२२	बुधवार	१	सार्वजनिक
२.	छत्रपती शिवाजी महाराज जयंती	१९-०२-२०२२	शनिवार	१	सार्वजनिक
३.	महाशिवरात्री	०१-०३-२०२२	मंगळवार	१	स्थानिक
४.	धुलीवंदन (होळी दुसरा दिवस)	१८-०३-२०२२	शुक्रवार	१	सार्वजनिक
५.	गुढी पाडवा	०२-०४-२०२२	शनिवार	१	सार्वजनिक
६.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती/महावीर जयंती	१४-०४-२०२२	गुरुवार	१	सार्वजनिक
७.	गुड फ्रायडे	१५-०४-२०२२	शुक्रवार	१	सार्वजनिक
८.	अक्षय तृतीया/रमजान ईद	०३-०५-२०२२	मंगळवार	१	सार्वजनिक
९.	२रे राष्ट्रीय लोक अदालत	०७-०५-२०२२	शनिवार	१	महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार
१०.	बुद्ध पौर्णिमा	१६-०५-२०२२	सोमवार	१	सार्वजनिक
११.	मोहर्रम	०९-०८-२०२२	मंगळवार	१	सार्वजनिक
१२.	स्वातंत्र्य दिन	१५-०८-२०२२	सोमवार	१	सार्वजनिक
१३.	पोळा	२६-०८-२०२२	शुक्रवार	१	स्थानिक
१४.	गणेश चतुर्थी	३१-०८-२०२२	बुधवार	१	सार्वजनिक
१५.	अनंत चतुर्दशी	०९-०९-२०२२	शुक्रवार	१	सार्वजनिक
१६.	दसरा/विजयादशमी	०५-१०-२०२२	बुधवार	१	सार्वजनिक
१७.	दीपावली नरक चतुर्दशी/लक्ष्मीपूजन	२४-१०-२०२२	सोमवार	१	सार्वजनिक
१८.	दीपावली अतिरीक्त	२५-१०-२०२२	मंगळवार	१	स्थानिक
१९.	दीपावली पाडवा बलिप्रतिपदा/भाऊबीज	२६-१०-२०२२	बुधवार	१	सार्वजनिक
२०.	दीपावली अतिरीक्त	२७-१०-२०२२	गुरुवार	१	स्थानिक
२१.	दीपावली अतिरीक्त	२८-१०-२०२२	शुक्रवार	१	स्थानिक
२२.	दीपावली अतिरीक्त	२९-१०-२०२२	शनिवार	१	स्थानिक
२३.	गुरूनानक जयंती	०८-११-२०२२	मंगळवार	१	स्थानिक

टीप.— खालील नमूद केलेले सण व राष्ट्रीय दिन रविवार, २ रा, ४ था शनिवार या दिवशी येत असल्यामुळे त्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यासंबंधी प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

अ.क्र.	सुट्टीचे नाव	दिनांक	वार	दिवस	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१.	श्रीराम नवमी	१०-०४-२०२२	रविवार	१	सार्वजनिक
२.	महाराष्ट्र दिन	०१-०५-२०२२	रविवार	१	सार्वजनिक

भाग—१—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
३.	बकरी ईद	१०-०७-२०२२	रविवार	१	सार्वजनिक
४.	गौरी पुजन	०४-०९-२०२२	रविवार	१	स्थानिक
५.	सर्वपित्री दर्श अमावस्या	२५-०९-२०२२	रविवार	१	सार्वजनिक
६.	महात्मा गांधी जयंती	०२-१०-२०२२	रविवार	१	सार्वजनिक
७.	ईद-ए-मिलाद	०९-१०-२०२२	रविवार	१	सार्वजनिक
८.	दीपावली धनत्रयोदशी	२३-१०-२०२२	रविवार	१	सार्वजनिक
९.	ख्रिसमस डे-नाताळ	२५-१२-२०२२	रविवार	१	सार्वजनिक

भाग—२

अनु. क्र. (१)	टीप (२)
१.	**ग्रिष्मकालीन अवकाश :** दिनांक ९ मे, २०२२ ते दिनांक ०४ जून, २०२२ पर्यंत. दिनांक ०६ जून, २०२२ पासून न्यायालयीन कामकाज नियमित सुरू होईल.
२.	**शितकालीन अवकाश :** २६ डिसेंबर, २०२२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२२. दिनांक ०२ जानेवारी, २०२३ पासून न्यायालयीन कामकाज नियमित सुरू होईल.
३.	प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी आणि प्रत्येक रविवारी जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर व संलग्न असलेले संबंधित सर्व दुय्यम न्यायालयांचे कामकाज बंद राहील.
४.	ग्रिष्मकालीन व शितकालीन अवकाशात २रा व ४था शनिवार व प्रत्येक रविवार तसेच सार्वजनिक सुट्ट्या वगळता इतर दिवशी सर्व फौजदारी न्यायालय व न्यायालयीन कामकाजाच्या कार्यालयीन शाखा सुरू राहतील.
५.	जिल्ह्यातील सर्व दिवाणी न्यायालयांचे कामकाज भाग-२ मध्ये जाहीर केलेल्या ग्रिष्मकालीन व शितकालीन अवकाश कालावधीमध्ये बंद राहील. तथापि, तातडीच्या दिवाणी प्रकरणांची सुनावणी पीठासीन अधिकारी यांचे परवानगीने करता येईल.
६.	माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार वरील सुट्ट्या तसेच ग्रिष्मकालीन व शितकालीन अवकाशात फेरबदल होऊ शकतो.

एस. बी. अग्रवाल,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नागपूर.

नागपूर :
दिनांक १६ डिसेंबर २०२१.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६२.

जिल्हाधिकारी, यांजकडून

आदेश

क्रमांक म.सहा.-ईआरके-कावि-०२-२०२२.—

राजकीय सेवा विभागाच्या दिनांक १६ जानेवारी, १९५८ च्या शासन निर्णय क्रमांक पी-१३-II-B व दिनांक ६ ऑगस्ट, १९५८ च्या शासन निर्णयानुसार प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून मी, प्रेरणा देशभ्रतार, जिल्हाधिकारी, वर्धा सन २०२२ या वर्षासाठी वर्धा जिल्ह्याकरिता खालील अनुसूचित नमूद प्रमाणे स्थानिक सुट्ट्या जाहीर करीत आहे.—

अनुसूची

अ.क्र. (१)	सणाचे नाव (२)	दिनांक (३)	दिवस (४)	स्थानिक सुट्टीचे क्षेत्र (५)
१.	नागपंचमी	०२-०८-२०२२	मंगळवार	संपूर्ण वर्धा जिल्हा
२.	पोळा	२६-०८-२०२२	शुक्रवार	
३.	घटस्थापना	२६-०९-२०२२	सोमवार	

हा आदेश वर्धा जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालय आणि अधिकोष (बँक) यांना लागू होणार नाही.

प्रेरणा देशभ्रतार,
जिल्हाधिकारी,
वर्धा.

वर्धा :
दिनांक १० जानेवारी २०२२.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६३.

BY ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE

Under Section 37 (1)(3) of Bombay Police Act, 1951.

No. Home-Desk-14(2)-WS-999-2021.—

Whereas, it has been brought to my notice that it is necessary to prevent commission of certain acts for peace and public order and safety.

And, whereas, I am satisfied that it is necessary to prevent commission of certain acts for the above said purpose.

Now, I Vijaya Bankar, Additional District Magistrate, Nagpur in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*3*) of Section 37 of the Bombay Police Act, 1951 (Bom. XXII of 1951) prohibit within the limits of entire Nagpur district excluding the city of Nagpur.

1. Assembly or procession of more than five persons.
2. The carrying of arms, cudgels, spears, bludgeons, guns, knives, sticks or lathis or any other article which is capable of being used for causing physical injury.
3. The carrying of corrosive substances or of explosives.
4. The carrying collection and preparation of stones or other missiles or instruments or means of a casting of impelling missiles.

This order shall come into force with immediate effect from 00.01 Hrs. of dated 21-12-2021 and shall remain inforce till 24.00 Hrs of dated 04-01-2022.

This order shall be proclaimed by affixing copies or it at Police Station and at conspicuous places in the above mentioned area and shall be published in the *Maharashtra Government Gazette.*

Given under my hand and seal of Court on this 20th day of December, 2021.

VIJAYA BANKAR,
Additional District Magistrate,
Nagpur.

Nagpur :
Dated the 20th December 2021.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६४.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

मुंबई पोलीस अधिनियम, सन १९५१ चा मुंबई पोलीस अधिनियम क्रमांक २२ ची कलमे ३७ (१) (३).

क्रमांक जिकागों-दंड-कावि-५२५-२०२१.—

ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, गोंदिया कार्यालयीन पत्र दिनांक २४ डिसेंबर, २०२१ नुसार दिनांक २७ डिसेंबर, २०२१ ते १० जानेवारी, २०२२ या कालावधीत जिल्ह्यात विविध पक्ष व संघटनाकडून त्यांच्या प्रलंबित मागणी संबंधाने उपोषणे, धरणे, मोर्चे, रस्तारोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केले जात आहेत. तसेच, दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी जि. प. व त्या अंतर्गत पं. स., नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक व ग्राम पंचायत पोट-निवडणुकीचे झालेल्या मतदानाची दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी तालुका स्थळी मतमोजणी होणार आहे. त्याचप्रमाणे दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी पासून खिसमस (नाताळ) व दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी नागरीकांकडून मावळते वर्षानिमित्त्य ठिकठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. तसेच, कोरोना विषाणुमुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाकडून लावण्यात आलेल्या निर्बंधावर शिथिलता बहाल करण्यात आल्याने लोकांची गर्दी वाढत आहे. या दरम्यान गर्दीवर नियंत्रण ठेवणेकामी तसेच कायदा व सुव्यवस्था राखणे कामी दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यामुळे संपूर्ण गोंदिया जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता/सार्वजनिक सुरक्षितता कायम राखणेस उक्त कालावधी करीता मनाई आदेश जारी करण्याची शिफारस केली आहे.

त्याअर्थी, मी, जयराम देशपांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारा अंतर्गत सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियम, क्रमांक २२ चे कलम ३७(१)(३) अन्वये गोंदिया जिल्ह्याकरीता सार्वजनिक शांतता/सार्वजनिक सुरक्षितता तसेच सार्वजनिक रस्त्यावर कायदा व सुव्यवस्था कायम राखणेसाठी, जि.प. व त्या अंतर्गत पं.स., नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक व ग्रामपंचायत पोट-निवडणुकीचे मतमोजणीच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक २७ डिसेंबर, २०२१ च्या ००.०१ वाजेपासून दिनांक १९-०१-२०२२ च्या २४.०० वाजेपर्यंत उक्त कालावधीकरीता मनाई आदेश याद्वारे देण्यात येत आहे.

१. शस्त्रे/सोटे/तलवारी/भाले/दंडे/बंदुका/सुरे/लाठ्या किंवा काठ्या किंवा शारिरीक ईजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे.

२. कोणताही दाहक किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

३. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा इतर क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

४. व्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा, यांचे प्रदर्शने करणे.

५. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

६. अशा, प्राधिका-यांच्या मते ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धक्का पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे अगर सोंग आणने/अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे व त्यांचे प्रदर्शने करणे किंवा त्यांचा जनतेत प्रसार करणे.

७. तसेच, उपविभागीय दंडाधिकारी/तालुका दंडाधिकारी तसेच ठाणेदार यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतीही मिरवणूक, मोर्चा काढण्यात येऊ नये.

सदर अधिसूचनेची सूचना सर्व उपविभागीय दंडाधिकारी/तालुका दंडाधिकारी तसेच ठाणेदार यांनी आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावून प्रसिद्धी करण्यात यावी.

सदर अधिसूचना दिनांक २७ डिसेंबर, २०२१ च्या ००.०१ वाजेपासून दिनांक १९-०१-२०२२ च्या २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहिल.

सदर अधिसूचना शासकीय तसेच बिन शासकीय कर्मचा-यांना त्यांच्या कर्तव्य काळात लागू असणार नाही. तसेच प्रेत यात्रा, धार्मिक कार्यक्रम अंतर्गत काढण्यात येणा-या मिरवणूकीस लागू असणार नाही.

सदर अधिसूचनेतील कोणत्याही शर्तीचे ज्याच्याकडून उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर फौजदारी नियमाअंतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

उपविभागीय दंडाधिकारी तसेच तालुका दंडाधिकारी यांना उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार यांचे अहवालाच्या आधारावर काही विशिष्ट अशा प्रकरणात सूट देण्याचे अधिकार प्राधिकृत करण्यात येत आहे.

माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २४ डिसेंबर, २०२१ ला सदर अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे.

जयराम देशपांडे,
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,
गोंदिया.

गोंदिया :
दिनांक २४ डिसेंबर २०२१.

ना.-एक–२ (१७३५).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.